सोमवार दि.१० जून २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २८२
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com


# मोदींनी तिसऱ्यांदा घेतली पंतप्रधानपदाची शपथ



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

नरेंद्र मोदी यांनी रविवारी ९ जून रोजी संध्याकाळी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. असे करणारे ते जवाहरलाल नेहरूंनंतरचे दुसरे पंतप्रधान ठरले आहेत. मोदींनी देवाच्या नावाने शपथ घेतली. यानंतर राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, जेपी नड्डा आणि शिवराज सिंह चौहान यांनी शपथ घेतली. मोदींसह ७२ मंत्र्यांनी शपथ घेतली.यामध्ये ३० कॅबिनेट मंत्री, ५ स्वतंत्र प्रभारी मंत्री आणि ३६ राज्यमंत्री करण्यात आले. राष्ट्रपती भवनात झालेल्या या सोहळ्याला ७ देशांच्या नेत्यांशिवाय देशातील सिनेतारकांनीही हजेरी लावली होती. यामध्ये अक्षय कुमार, शाहरुख खान, विक्रांत मॅसी आणि राजकुमार हिरानी यांचा समावेश होता. रिलायन्स समुहाचे अध्यक्ष मुकेश अंबानीही उपस्थित होते.



# बी-बियाणे,खतांची निर्धारित दरापेक्षा जादा दराने विक्री करू नये-आ.सुरेश धस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

जूनच्या पहिल्याच आठवड्यात वरूण राजाने दमदार हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला असून उघडीप मिळाल्यावर खरीप हंगामाचे काम सुरू करणार आहे.लगेच तालुक्यातील शेतकरी वर्ग पेरणीच्या लगबगीला लागणार असून पेरणीसाठी आवश्यक बी-बियाणे आणि खतांसाठी मागणी वाढणार आहे.याचा गैरफायदा काही बी- बियाणे आणि खत विक्री करणारे विक्रेते घेतात आणि सरकारच्या निर्धारित दरापेक्षा जादा दराने विक्री करतात असे प्रकार होऊ नयेत शेतकऱ्यांना चढ्या भावाने बी-बियाणे,खते विक्री करू नये असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले



आहे.या प्रसिद्धीपत्रकात पुढे आ.धस म्हणतात की,सरकारने निर्धारित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने पेरणी बी,बियाणे अथवा खतांची विक्री करत असल्यास एखादी कंपनी अथवा कृषी सेवा केंद्र वाढीव दरात खत विकत असल्यास त्याची माहिती आष्टी तहसील कार्यालय किंवा आष्टी तालुका कृषी कार्यालयात नेमणूक केलेल्या अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार करावी.तसेच बी-बियाणे, खते विक्री करणाऱ्या दुकानदारांनी चढ्या भावाने विक्री न करता राज्य सरकारने निर्धारित केलेल्या नियमांचे सर्व विक्रेत्यांनी पालन करावे.गतवर्षी पडलेल्या दुष्काळामुळे शेतकरी वर्ग आर्थिक संकटात असून चढ्या भावाने बी -बियाणे खते घेतल्याने आर्थिक संकटाचा बोजा शेतकऱ्यांना लादला जाऊ शकतो त्यामुळे असे न करता सर्व विक्रेत्यांना विनंती आहे की, शेतकऱ्यांची लूटमार न करता योग्य भावातच बी-बियाणे खते द्यावेत अशी विनंती आमदार सुरेश धस यांनी केली आहे.

## दूध उत्पादक शेतकऱ्यांनो मकाच्या पीक पेरणी व उत्पादनाकडे भर द्या-आ.धस

**आष्टी तालुक्यासह मतदारसंघात दूध उत्पादक शेतकरी मोठया प्रमाणात असल्याने तसेच दूध उत्पादकांना आगामी काळात चारा टंचाई भासू नये म्हणून दूध उत्पादक शेतकऱ्यांनी मकेच्या पीक पेरणी व उत्पादनाकडे भर द्यावा आणि मुरघास करावा यातून चारा टंचाई व दूध उत्पादन वाढण्यासाठी प्रयत्न होईल. शेतकऱ्यांनी मका पीकाचे पेरणीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढवावे तर मुरघास करण्यासाठी लागणारे बॅग मागणीसाठी प्रत्येकाने गावचे सरपंच किंवा ग्रामसेवक यांच्याकडे लेखी मागणी करावे असेही आमदार सुरेश धस यांनी शेतकऱ्यांना केले आहे.**

# राजकीय:सामाजिक तणाव, जातीवाद, वाईट टीका टिपणी चुकीची- खासदार नीलेश लंके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी छत्रपतींच्या महाराष्ट्रात माता-भगिनींविषयी अपशब्द वापरले जात असतील तर ती अशोभनीय गोष्ट आहे. सामाजिक तणाव, जातीवाद, वाईट टीका टिपणी योग्य नाही. झाले गेले गंगेला मिळाले, सर्व काही सोडून द्या. सोशल मीडियावर आक्षेपार्ह लिखाण करून स्टेटस ठेवून खालच्या पातळीवर जाऊन होत असलेल्या टीकेबाबत निषेध करत असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले.

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्याविरुद्ध तालुक्यातील शिरापूर येथील एका व्यक्तीने आक्षेपार्ह लिखाण करत स्टेटस ठेवले. अन्य व्यक्तींकडून वाईट शब्दांमध्ये कमेंट केल्या जात आहेत. त्यावरून तालुक्यात सामाजिक तणाव वाढला आहे. परळी एवढाच प्रभाव मुंडे कुटुंबाचा पाथर्डीवर आहे. वंजारी समाजाच्या मतदारांची संख्या खूप मोठी आहे. शुक्रवारी पाथर्डी बंद ठेवून मुंडे समर्थकांनी सामाजिक एकतेचे मोठे शक्ती प्रदर्शन करत मोर्चा काढला.मुंडे समर्थक आक्रमक कार्यकर्त्यांनी बंद दरम्यान संपूर्ण शहरभर गस्त ठेवली होती. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार शुक्रवारी खासदार लंके यांचा सत्कार प्रताप ढाकणे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला. पंकजा मुंडे यांच्या बदनामी प्रकरणावरून तालुक्यात झालेले अशांत व संवेदनक्षम वातावरण पाहता राष्ट्रवादी काँग्रेसनेही लोक भावनेचा आदर करत खासदार लंके यांची विजयी मिरवणूक रद्द केली.सत्कार कार्यक्रम साधेपणाने घेत मुंडे यांच्याविरुद्ध सुरू असलेल्या लेखनाचा निषेध केला. नगर मतदार संघात भाजपचा पराभव केल्याचे वातावरण ताजे असताना राजकीय विचारांची जोडे बाजूला ठेवत खासदार लंके व ॲड. प्रताप ढाकणे यांच्याकडून भाषणातून मुंडे प्रकरणाविरुद्ध झालेला निषेध राजकीय वर्तुळातही चर्चेचा विषय ठरला. ॲड. ढाकणे म्हणाले, सामाजिक तणाव कुठल्याही परिस्थितीत चांगला नाही. एखाद्या नेत्याबद्दल अशा पद्धतीने बोलणे, अपशब्द वापरणे चुकीचे आहे.

# शेख शागिर्द अहमद सर यांना एकता सेवा भावी संस्थेचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर

## ११ जुन रोजी मराठी पत्रकार भवन मुंबई येथे होणार पुरस्कार वितरण सोहळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**



सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल उस्मानाबाद येथील सेवानिवृत्त कर्तव्यदक्ष व आदर्श शिक्षक श्री.शेख शागिर्द अहमद(सर)यांना एकता सेवा भावी संस्थेचा मानाचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला असुन या पुरस्काराचे वितरण प्रमुख मान्यवर अतिथींच्या उपस्थितीत व हस्ते मंगळवार दिनांक ११ जुन-२०२४ रोजी मराठी पत्रकार भवन,मुंबई येथे करण्यात येणार आहे. श्री.शेख शागिर्द अहमद(सर) यांचे शैक्षणिक क्षेत्रात फार मोठे योगदान व कार्य असुन त्यांनी त्यांच्या शिक्षकी कार्यकाळात फार मोठ्या प्रमाणात विद्यार्थी घडविले आहे. तसेच त्यांचा सामाजिक कार्यातही फार मोठ्या प्रमाणावर सहभाग असतो. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना एकता सेवा भावी संस्थेतर्फे दिला जाणारा मानाचा शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. श्री. शेख शागिर्द अहमद(सर)यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील महाराष्ट्र गौरव हा पुरस्कार जाहीर झाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात असून त्यांना पुढील कार्यासाठी व वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# पंतप्रधानाची शपथ घेताच सेनगाव शहरांमध्ये भाजप कार्यकर्त्याकडून जल्लोष

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा शपथविधी घेतल्याने सेनगाव शहरांमध्ये भाजप कार्यकर्त्याकडून घोषणाबाजी करत जल्लोष करण्यात आला यावेळी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते मा, श्री,नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानाचा पदभार स्वीकारल्याने कार्यकर्त्यामध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाली यावेळी कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे वाटप केले यावेळी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते हिम्मत



राठोड,आप्पासाहेब भाऊ देशमुख, मारोतराव अण्णा काळबांडे, बाळू अण्णा उफाड, विलासराव जाधव, संतोषराव खेडेकर, विवेक तांबिले, संतोष राव मरडे, दीपकराव फटांगळे, अजय मामा विटकरी, गणेश राव जारे, दसरथ मुंढे, शिवाजीराव देशमुख, मनोज हजारे सह आदी भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते,

## ‘राष्ट्रवादी’ला राज्यमंत्रीपद अमान्य

**मुंबई (वृत्तसंस्था)**-भारतीय जनता पार्टीच्या वतीने अजित दादा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला राज्यमंत्री स्वतंत्र प्रभाराची ऑफर देण्यात आली होती. परंतु त्यांच्याकडून प्रफुल्ल पटेल यांचे नाव निश्चित झालेले होते. त्यामुळे कॅबिनेट मंत्री राहिलेल्या व्यक्तीला राज्यमंत्रीपदी बसवणे त्यांना संयुक्त वाटत नसल्याने त्यांनी ही ऑफर नाकारली.

## चारोळी

सुखदु:खाच्या झुल्यावरच
आयुष्य थोडे खुलते
हिरवळीत अन कोरडया रानीही
ते नव्याने फुलते.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# बुलढाण्याला केंद्रात तिसऱ्यांदा लाल दिवा प्रतापरावांची केंद्रीय मंत्रीपदी वर्णी

**लोकसभा निवडणुकीत विजयाचा चौकार मारल्यानंतर खासदार प्रतापराव जाधव यांनी मोदी सरकार मध्ये केंद्रीय मंत्रिपदाची शपथ घेतली त्यानंतर जिल्हाभरात महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून आनंदोत्सव साजरा करण्यात आलायावेळी शिवसेना नेते गजेंद्र देशमुख शिवसेना शहरप्रमूख रामेश्वर पवार भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सचिव छगन खंदारे ,तालुका महामंत्री जावेद शेख राष्ट्रवादी कॉंगेस पक्षाचे शेख इरफान अली,विलासराव देशमुख गजानन देशमुख माजी सरपंच बाळासाहेब मोहिते व इतर महायुतीचचे पदाधिकारी तथा गावकरी मंडळी उपस्थीत होते**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

जिल्ह्याची केंद्रीय मंत्री पदाची राजकीय हॅट्रिक साधली जाणार आहे. यापूर्वी काँग्रेसचे तत्कालीन युवा नेते खासदार मुकुल वासनिक यांच्या रूपाने जिल्ह्याला प्रथमच केंद्राचा लालदिवा मिळाला होता.पंतप्रधान नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळात मुकुल वासनिक यांना क्रीडा युवक कल्याण खात्याचे राज्यमंत्री पद मिळाले होते. मूळचे नागपूरकर असलेले वासनिक यांनी १९८४ मध्ये बुलढाण्यातून निवडणूक लढवून खासदारकी मिळविली. १९८९ च्या लढतीत दारुण पराभव झाल्यावर १९९१ मध्ये पुन्हा बाजी मारली. त्यानंतर त्यांना राज्यमंत्री पद देण्यात आले. २००९ मध्ये



बुलढाणा लोकसभा मतदारसंघ खुला झाल्याने त्यांनी रामटेक मतदारसंघातून निवडणूक जिंकली. त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान डॉ मनमोहनसिंग यांच्या मंत्री मंडळात त्यांना सामाजिक न्याय विभागाचे कॅबिनेट मंत्री पद मिळाले होते.दरम्यान १९९६ च्या लढतीत वासनिकांचा पराभव करून कामगार नेते आनंदराव अडसूळ हे प्रथमतः बुलढाण्याचे खासदार झाले. १९९८ मध्ये पराभूत झाल्यावर १९९९ मध्ये त्यांनी पुन्हा विजय मिळविला. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्री मंडळात त्यांच्यावर अर्थ नियोजन खात्याच्या राज्यमंत्री पदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. आज खासदार जाधव यांच्या रूपाने जिल्ह्याला तिसऱ्यांदा संधी मिळाले आहे. मात्र वासनिक हे नागपूर आणि अडसूळ हे मुंबई चे असल्याने ते ‘बाहेरचे’ होते.त्या अर्थाने जिल्ह्याच्या भूमीपुत्राला केंद्रीय मंत्री पद मिळण्याची ही पहिली वेळ आहे.

संपादकीय

# राज्यांमधला दिलासा

लोकनेता न्यूज नेटवर्क

लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी चालली असतानाच देशात चार विधानसभांच्या निवडणुका पार पडल्या. अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, आंध्र प्रदेश आणि ओडिशा ही ती चार राज्ये. यातल्या अरुणाचल आणि सिक्कीमचा निकाल आधी लागला. लोकसभेबरोबर आंध्र व ओडिशा यांचा निकाल लागला. अरुणाचल आणि ओडिशा या दोन्ही राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले. यात अरुणाचलमध्ये लागोपाठ दुसरा विजय मिळाला आहे. ओडिशातील विजय मात्र लक्षणीय आणि पूर्व भारतातील भाजपचे स्थान पक्के करणारा आहे. तेथे मुख्यमंत्री नवीन पटनाईक हे ‘अजेय’ असल्याचे चित्र उभे राहिले होते. गेल्या वेळी मतदारांनी अशाच एकत्र निवडणुका झाल्या, तेव्हा भाजपला दिल्लीसाठी पाठिंबा देताना राज्यात मात्र नवीनबाबूंना प्राधान्य दिले होते. त्यावेळचे हुशारीने केलेले दुहेरी मतदान यावेळी मतदारांनी टाळले. दोन्हीकडे भाजपलाच कौल दिला. यामुळे नवीन पटनाईक यांची ओडिशाला विकासाच्या नव्या वाटेवर नेणारी २४ वर्षांची अप्रतिहत सत्ता संपुष्टात आली. पटनाईक यांचे वय आता ७७ असून त्यांची प्रकृतीही अनेकदा ठीक नसते. लोकसभा आणि विधानसभा अशा दोन्हीकडे झालेला पराभव म्हणजे एका अर्थाने पटनाईक यांच्या राजकीय कारकीर्दीचा समारोपच म्हणावा लागेल. अपेक्षेप्रमाणे केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान ओडिशाचे मुख्यमंत्री होतात की भाजप पुन्हा धक्कातंत्र वापरतो, हे आता कळेल. ओडिशातील हे भाजपचे पहिले सरकार असेल.ओडिशात एकहाती विजय मिळवत असतानाच भाजपने आंध्र प्रदेशात चंद्राबाबू नायडू यांच्या साथीने यश मिळविले आहे. नायडू हेच तेथे मोठे भाऊ आहेत. आंध्रच्या विधानसभेत १७५ आमदार असताना चंद्राबाबूंनी भाजपला आघाडीत केवळ दहा जागा दिल्या होत्या. आंध्रची भाजप प्रदेश शाखा यावर नाराज होती. मात्र, ही आघाडी भाजपच्या लाभाची ठरली आहे. या दहातील आठ ठिकाणी तर भाजपला विजय मिळालाच, पण तेलुगू देसमला केंद्रीय सत्तेत स्थान मिळत असतानाच भाजपलाही राज्यात सत्तेतील वाटा मिळणार आहे. तेलुगू देसम आणि भाजप अशा दोघांच्याही लाभाचा सौदा आंध्र प्रदेशात झाला आहे. चंद्राबाबू हे आता ७४ वर्षांचे असले तरी एकेकाळी ते देशातील सर्वाधिक तंत्रस्नेही मुख्यमंत्री म्हणून गाजले होते. हैदराबादचे ‘सायबराबाद’ त्यांच्याच पुढाकाराने झाले होते. आंध्र आणि तेलंगण ही दोन राज्ये झाल्यावर हैदराबाद तेलंगणकडे गेले. हैदराबादवरील राजधानी म्हणून असणारा आंध्रचा अधिकार काही दिवसांपूर्वीच संपला आहे. नायडूंना अमरावती ही जागतिक दर्जाची आधुनिक राजधानी बांधायची होती. तिचे भूमिपूजनही मोदी यांच्या हस्ते झाले होते. तो प्रकल्प जगनमोहन रेड्डी यांनी सत्तेत येताच बासनात गुंडाळला. आता नायडू यांना केंद्राच्या मदतीने ही अत्याधुनिक राजधानी बांधता येईल. त्यांना आंध्रसाठी ‘विशेष दर्जा’ही हवा आहे. नायडू हे कमालीचे चाणाक्ष राजकारणी आहेत. त्यांचे केंद्रातील वाढते महत्त्व त्यांच्या राज्यासाठी लाभकारक ठरते का, हे आता दिसेलच. आंध्र प्रदेशात वायएसआर काँग्रेस तसेच काँग्रेस यांचा मोठा पराभव झाला आहे. भाजपने मित्र निवडण्यात आंध्रमध्ये चूक केली नाही, याचा लाभ दोघांनाही झाला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्या कार्यकाळापासूनच ईशान्य भारताकडे अधिक लक्ष पुरविले आहे. त्याचा राजकीय लाभही भाजपला होत आला आहे. विशेष म्हणजे, ईशान्येतील राज्यांमध्ये विजय मिळविणारे प्रादेशिक पक्षही बहुतेकदा भाजपच्या विरोधात न जाता केंद्र सरकारला पाठिंबा देण्याची भूमिका घेतात. सिक्कीममध्ये ‘सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा’ या सत्तारुढ पक्षाने ३२ पैकी ३१ जागा जिंकून विरोधकांना भुईसपाट केले आहे. तिथले मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग हे एकेकाळी शिक्षक होते. पवनकुमार चामलिंग यांची विक्रमी कारकीर्द संपवून तमांग मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी राज्यावर जबर पकड बसविली आहे. देशभरातील लाखो पर्यटक ईशान्येकडे वळत असताना सिक्कीमधील प्रचंड महाग वाहतूक आणि फसवे ट्रॅव्हल एजंट यांचा राज्याला जबर फटका बसतो आहे. तमांग यांनी पूर्वी काही प्रयत्न केले होते. आता त्यांना नव्याने प्रयत्न करावे लागतील. तमांग यांच्या पुढाकाराने राज्यातील ७५ हजार हेक्टरवर जैविक शेती केली जाते. हा प्रयोग केंद्र व राज्य यांना मिळून यशस्वी करावा लागेल. ईशान्येतले दुसरे राज्य असणाऱ्या अरुणाचलची प्रत्यक्ष निवडणूक होण्याआधीच दहा जागा भाजपने बिनविरोध जिंकल्या होत्या. आता निवडणुकीत भाजपने ६० सदस्यांच्या विधानसभेतील ३६ जागा जिंकून आमदारसंख्या ४६वर नेली आहे. मुख्यमंत्री पेमा खांडू हेही बिनविरोध निवडून आलेले एक आमदार होते. आता ते तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होतील. अनेक ठिकाणी पडझड होत असताना दोन राज्यांत थेट सत्ता तर दोन राज्यांत मित्रपक्षांची सरकारे आल्याने भाजपला हा मोठाच दिलासा मिळाला आहे.

# शेअर बाजाराची कोलांटउडी

लोकनेता न्यूज नेटवर्क



एक्झिट पोलची भाकीते शेअर बाजारात कोट्यवधींची उलथापालथ घडवून आणू शकतात, हे यंदा प्रथमच दिसले. एक्झिट पोलचे अंदाज किती सपशेल आपटले, याचा अनुभव निकालाच्या दिवशी सर्वांनी घेतला. परंतु त्याचबरोबर प्रत्यक्ष निकालांमधील आकडेवारी येताच पुन्हा एकदा शेअर बाजारच्या सेन्सेक्समध्ये सहा हजार बिंदूंची घसरण झाली. नंतर बाजार थोडा सावरून ही घसरण चार हजारांपर्यंत थोपविण्यात यश आले.तीनशे जागांच्या आत परंतु सरकार स्थापन करण्याइतपत तरी मजल भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी मारू शकेल, हे स्पष्ट झाल्यानंतर बाजार सावरला. तरीही दिवसभरात जवळपास पाच टक्क्यांनी शेअर बाजार कोसळला. चार वर्षांत इतक्या मोठ्या प्रमाणात बाजाराची पडझड प्रथमच दिसली. सेन्सेक्स ७० हजार अंकांवर गेल्यापासून भारतीय शेअर बाजारात आंतरराष्ट्रीय घटनांचे परिणाम इतक्या मोठ्या प्रमाणावर सध्या होत नाहीत. युक्रेन-रशिया युद्ध किंवा अगदी अलीकडे इस्रायल-हमास यांच्यातील संघर्ष पेटल्यानंतरही त्याचे दुष्परिणाम भारतीय शेअर बाजारावर इतके तीव्र झाले नाहीत. पूर्वी विदेशी वित्तीय संस्थांनी त्यांच्याकडील समभाग विक्रीस काढल्यास शेअर बाजारावर परिणाम होत असे. पुरवठा वाढायचा व मागणी कमी त्यामुळे बाजार पडायचा. गेल्या काही वर्षांत बाजार सशक्त झाला असून स्वदेशी गुंतवणूकदारांची संख्या व ऐपत वाढली आहे. त्यामुळे विदेशी गुंतवणूकदारांनी गुंतवणूक काढून घेतली, तरी ती शोषून घेण्यास मदत होते. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार समभाग विक्रीस काढतात, तेव्हा देशांतर्गत गुंतवणूकदारांकडून खरेदी होते. म्युच्युअल फंडांमध्ये एसआयपीद्वारे दरमहा विशिष्ट गुंतवणूक करण्याची सवय पगारदारांमध्ये वाढली आहे. बँकेच्या बचतींऐवजी हा पैसा भांडवली बाजारात येतो. तरीही भाकीते आणि त्यातली अनिश्चितता हा शेवटी बाजारातील चढउताराचा आत्मा असतो. कंपन्यांची आर्थिक स्थिती, त्यांचा नफा, रुपयाचे स्थान, वस्तूंसाठीची मागणी व पुरवठा, ग्राहकांची क्रयशक्ती एवढ्याच आर्थिक कसोट्यांवर बाजाराची स्थिती ठरत नाही. राष्ट्रीय आर्थिक धोरणे राबविण्यासाठी लागणारे राजकीय स्थैर्य आणि उद्योगांना पोषक धोरणे याकडे बाजाराचे लक्ष असते. अनिश्चिततेची चाहूल लागली तरी बाजार हलतो आणि त्यावरच अनेकांच्या कमाईचेही भवितव्य ठरते. गेल्या दोन दिवसांत किती जणांनी कमावले, किती कंगाल झाले, हे पाच-दहा समभागांपुरती छोटी गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांना कळणार नाही. शेअर बाजारासाठी हे करेक्शन मानायचे की अस्थिरतेची चाहूल, हे राजकीय घडामोडींवर अवलंबून राहील.

# आता मलमपट्टी पुरेशी नाही

लोकनेता न्यूज नेटवर्क



यंदाचा उन्हाळा शब्दशः जीवघेणा आहे. जगभरात या वर्षीच्या उष्मा लहरींमुळे अनेक आघात सहन करावे लागले आहेत. अर्थात हा काही एका वर्षात अचानक झालेला बदल नाही. हवामान बदल हा शब्द साधारण ९०च्या दशकात प्रचलित झाला. त्यापूर्वी सन १९३८मध्ये जागतिक तापमान वाढत असल्याचा पुरावा देत गाय कॅलेंडर नावाच्या एका हौशी शास्त्रज्ञाने पृथ्वी गरम झाल्याचे शोधून जणू इतिहासच लिहिला. मागील ५० वर्षांच्या तुलनेत जागतिक तापमान ०.३ अंश सेल्सियसने वाढले आहे, असे त्यांनी जगभरातील १४७ हवामान केंद्रांवरून मोठ्या कष्टाने नोंदी गोळा करून शोधून काढले.महायुद्धे आणि औद्योगिक क्रांतीचे परिणाम दिसायला सुरुवात झाली तो हा काळ. सन १९५४मध्ये कार्बन डायऑक्साइडची पातळी वाढली आणि दोष मात्र जीवाश्म इंधनाला दिला गेला. शास्त्रज्ञांनी पृथ्वीच्या हवामानाचे पहिले संगणकीय मॉडेल तयार केले. कार्बन डायऑक्साइडची सांद्रता दुप्पट झाल्यावर जागतिक तापमान दोन अंश सेल्सियसने वाढू शकते, असे ते मॉडेल सांगत होते. सन १८८० ते १९६७ या काळात ते १.१ अंशांनी वाढले होते. सन १९६८मध्ये डॉ. जॉन मर्सर यांनी, बर्फाच्या ध्रुवीय टोप्या वितळायला सुरुवात झाली आहे, हे पुराव्यानिशी सिद्ध केले. सन १९६९मध्ये नासाने निंबस ३ उपग्रह कक्षेत प्रक्षेपित केला आणि त्याने जागतिक वातावरणातील तापमानाचे पहिले अचूक मापन केले. सन १९८५मध्ये ओझोन छिद्रांचा शोध लागला. सन १९८८मध्ये इंटर गव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंजने हवामान संशोधनाच्या नवीन युगाची घोषणा केली. या नंतरच्या संशोधनाने संपूर्ण सजीव सृष्टीवरील हवामान बदलांचे परिणाम सर्वांसमोर आणायला सुरुवात केली. सन १९९२मध्ये प्रवाळ रांगा धोक्यात आहेत हे समोर आले. सन १९९४मध्ये पहिला हवामान बदल कायदा अंमलात आला. १९७ देशांनी हवामान बदलाचा सामना करण्यासाठी पहिल्या जागतिक करारावर स्वाक्षरी केली. नंतर यात बदल झाले.विज्ञान-तंत्रज्ञानातील अफाट संशोधनाचा हा काळ. याला मिळालेली गती दशकानुसार चक्रवाढ व्याजाप्रमाणे वाढतेच आहे. तापमानातील ०.३ अंश सेल्सियस वाढ धोक्याची आहे, हे सांगूनही त्याकडे दुर्लक्ष झाले. विकासाच्या चुकीच्या दिशेकडे आपण आगेकूच करीत राहिलो. हवामान शास्त्रज्ञांनी हे दाखवून दिले आहे, की गेल्या २०० वर्षांतील वाढलेल्या जागतिक तापमानाला मानव जबाबदार आहे. २०११-२०२० हे सर्वांत उष्ण दशक होते आणि गेल्या चार दशकांपैकी प्रत्येक दशक १८५०नंतरच्या कोणत्याही मागील दशकापेक्षा जास्त उष्ण राहिले आहे. त्यामुळे पुढील दशक काय असेल हे सांगायला नको. आणि तापमानवाढ ही तर कथेची केवळ सुरुवात आहे. हवामान बदलाच्या परिणामांमध्ये तीव्र दुष्काळ, पाणीटंचाई, समुद्राची वाढती पातळी, पूर, ध्रुवीय बर्फ वितळणे, आपत्तीजनक वादळे आणि घटती जैवविविधता यांचा समावेश होतो. हवामानाच्या परिणामांशी जुळवून घेतल्याने लोक, घरे, व्यवसाय, उपजीविका, पायाभूत सुविधा आणि नैसर्गिक परिसंस्था यांचे संरक्षण होते. सर्वत्र अनुकूलन आवश्यक आहेच; परंतु, हवामानाच्या धोक्यांचा सामना करण्यासाठी सर्वांत कमी संसाधने असलेल्या सर्वांत असुरक्षित लोकांना प्राधान्य द्यायला हवे.शास्त्रज्ञांनी असे म्हटले आहे, की या वर्षी जन्माला येणाऱ्या अर्भकांसाठी हे वर्ष ‘सर्वांत थंड वर्ष’ असेल! या वर्षीचा उष्मा प्रचंड दाहक रूपाने सगळ्यांवर आघात करत आहे. उन्हामध्ये बाहेर न पडता देखील अनेक लोक याचे बळी पडत आहेत. दीड अंश सेल्सियसपर्यंतच्या तापमान वाढीला आपण काही प्रमाणात तरी तोंड देऊ शकतो; परंतु या शतकाअखेर ही वाढ सुमारे तीन अंश सेल्सियस इतकी असेल, असा अंदाज आहे. याचा सर्वांत मोठा परिणाम चीन, अमेरिका, भारत, युरोपियन युनियन, इंडोनेशिया, रशियन फेडरेशन आणि ब्राझील या देशांवर होणार आहे. भौगोलिक स्थान ते लोकसंख्या आणि पर्यावरण हानी अशी अनेक कारणे यामागे आहेत.सन १९९८-२०१७ या काळात एक लाख ६६ हजारांहून अधिक लोक उष्णतेच्या लाटेमुळे मरण पावले. यात ७० हजारपेक्षा अधिक लोक युरोपमधील सन २००३च्या उष्णतेच्या लाटेत मरण पावले. सन २००० ते २०१६ दरम्यान उष्णतेच्या लाटेच्या संपर्कात आलेल्या लोकांच्या संख्येत सुमारे १२.५ कोटींची वाढ झाली. सन २०००-२००४ आणि २०१७-२०२१ दरम्यान ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांसाठी उष्णतेमुळे मृत्यूचे प्रमाण अंदाजे ८५ टक्क्यांनी वाढले. सन २०००-२०१९ दरम्यानच्या अभ्यासानुसार दरवर्षी अंदाजे चार लाख ८९००० उष्मा-संबंधित मृत्यू होतात. त्यापैकी ४५ टक्के आशियात, आणि ३६ टक्के युरोपमध्ये होतात. एकट्या युरोपमध्ये सन २०२२च्या उन्हाळ्यात उष्णतेमुळे ६१,६७२ मृत्यू झाले. उच्च तीव्रतेच्या उष्णतेच्या लाटेमुळे मृत्युसंख्या तीव्र होते. सन २००३मध्ये, जून-ऑगस्टच्या घटनेमुळे युरोपमधील ७० हजार लोक मरण पावले. सन २०१०मध्ये रशियन फेडरेशनमध्ये ४४ दिवसांच्या उष्णतेच्या लाटेत ५६ हजारांपेक्षा अधिक मृत्यू झाले.या संदर्भातील भारतातील नेमकी आकडेवारी समोर आलेली नाही; परंतु एकट्या पूर्व विदर्भात सुमारे ५० मृत्यू केवळ उष्माघाताने झाले आहेत. तसेच देशभरात मार्चनंतर सुमारे १७ हजार प्रकरणे उष्माघाताशी निगडित असल्याचा अंदाज आहे. दिल्लीचे तापमान ५० अंश सेल्सियसच्या पुढे गेल्याचे बोलले गेले. यातील वास्तव बाहेर यायचे आहेच! यापुढील उन्हाळे अजून तापट असतील. यात लहान मुलाचे खूप हाल होतात. ती विशेषतः उष्णतेप्रति संवेदनशील असतात. सन २०५०पर्यंत जगातील जवळजवळ प्रत्येक म्हणजेच २.२ अब्ज मुले वारंवार उष्णतेच्या लाटांना सामोरे जातील!उद्याच्या पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर यावर विचार आणि कृती होणे महत्त्वाचे आहे. ती वैयक्तिक सामूहिक आणि राजकीय पातळीवरही व्हावी. केवळ भाषणे आणि आश्वासने, उत्सव, समारंभ याने काही होणार नाही. जमिनीवर ६५ टक्के भाग हा जंगल आणि वने यांनी व्यापलेला रहावा, असे वाटत असल्यास मानवी आणि एकूणच सजीव सृष्टीच्या जीवनामध्ये संतुलन राहू शकते. आता जी स्थिती आहे त्यात निसर्ग साखळीतील अनेक दुवे आधीच नष्ट झाले आहेत. एखादी प्रजाती नष्ट झाली तर काय होईल, अशा अविवेकी आणि संकुचित विचारांमुळे निर्माण झालेल्या स्थितीची झळ प्रत्येक घरात पोहोचली आहे. सृष्टीतील प्रत्येक लहानसा जीव देखील महत्त्वाचा आहे. अगदी साधा विचार करा, मुंग्या नाहीश्या झाल्या तर काय होईल? किंवा गवत राहिले नाही तर? दोन्हीची उत्तरे एकच...आपणही राहणार नाही किंवा प्रचंड कठीण अवस्थेत येऊ!पर्यावरणाबाबत आता तात्पुरती काळजी किंवा मलमपट्टी फार काळ चालणार नाही. अनेक संस्था आणि व्यक्ती पर्यावरण रक्षणासाठी आपापल्या पातळीवर प्रयत्न करीत आहेत; परंतु ते आता पुरेसे नाहीत! हवामान कृतीसाठी सरकार आणि व्यवसायांद्वारे महत्त्वपूर्ण आर्थिक गुंतवणूक आवश्यक आहे. हरित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करू शकतील अशा योजना आणि कृती सगळे नेते आणि शासन यांचा प्राधान्याचा अजेंडा असायला हवा. केवळ स्वार्थी आणि आभासी सुखाकडे नेणारा विकास हवा, की सृष्टी आणि सर्व मानवजातीला सुखाने आणि आनंदाने जगू देणारा परस्परपूरक विकास हवा, हे या पर्यावरण दिनाच्या निमिताने ठरवायला हवे!

# झाले क्षत्रिय कुलावतंस श्री राजे शिवछत्रपती!

लोकनेता न्यूज नेटवर्क

रायगडावर दि.६ जून १६७४ रोजी झालेला शिवराज्याभिषेक सोहळा हा त्या गडावर आलेल्या प्रत्येकासाठी जणू दसरा-दिवाळी उत्सवासारखाच होता. आपल्या लाडक्या राजाला सिंहासनावर बसलेला पाहण्यासाठी असंख्य जनता आसुसून तेथे उपस्थित होती. हा सोहळा ज्यांनी याचि देही, याचि डोळा अनुभवला त्या प्रत्येकाच्या मनात आपण धन्य झालो, ही एकच भावना होती. या सोहळ्यात अशा काही खास गोष्टी करण्यात आल्या, ज्या केवळ ऐकून तुमच्या अंगावर रोमांच उभा राहिल्याखेरीज राहणारच नाही. ज्या ऐकून तुम्हाला कदाचित तुमच्या डोळ्यासमोर या शिवराज्याभिषेक सोहळ्याची हलकीशी छटा सुद्धा निर्माण होईल, चित्रफितीसारखी! अशा या नयनरम्य सोहळ्याचे सुंदर शब्दचित्रण श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या लेखात बघा... संपादक. रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्याची तयारी कित्येक महिन्यांपासून सुरु होती. या सोहळ्याच्या नऊ दिवस आधी या राज्याभिषेकाशी संबंधित अनेक विधी पार पडले. दि.६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक झाला. या दिवशी पहाटे उठून, मंत्रोचार आणि संस्काराबरोबर आंघोळ करून, कुलदेवतेला स्मरून, राज्याभिषेक सुरू झाला. गागाभट्ट आणि इतर ब्राह्मणांना यावेळीही आभूषणे आणि वस्त्रे भेट देण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी शुभ्र वस्त्रे परिधान केली होती. गळ्यात फुलांच्या माळा इकडून तिकडे व तिकडून इकडे रूळत होत्या. राज्याभिषेकात महाराजांचे अभिषेक आणि डोक्यावर छत्र धरणे, हे दोन प्रमुख विधी होते. दोन फूट लांब व दोन फूट रुंद अशा सोन्याने मढवलेल्या मंचकावर छत्रपती शिवाजी महाराज बसले, शेजारी रेशमी उपरण्याला भरजरी साडीचे टोक बांधलेली सोयराबाई दुसऱ्या मंचकावर, तर बाल शंभूराजे नटूनथटून थोडेसे मागे बसले होते. अष्टप्रधान मंडळातील आठही प्रधान गंगेसारख्या विविध नद्यांतून आणलेले पाण्याचे जलकुंभ घेऊन उभे होते. त्यानंतर त्या जलकुंभांनी छ.शिवाजी महाराजांवर अभिषेक झाला. त्यावेळी मंत्रोच्चारण आणि आसमंतात विविध मंगल सुरवाद्य निनादत होते. सोळा सुवासिनींनी पंचारती ओवाळली. यानंतर छ.शिवाजी महाराजांनी लालरंगाचे वस्त्र परिधान केले. जडजवाहिर, अलंकार परिधान केले. गळ्यात फुलांचे हार घातले. एक रुबाबदार राजमुकूट घातला. आपली ढालतलवार आणि धनुष्यबाण यांची पूजा केली. या शुभ मुहूर्ताच्या वेळी राजसिंहासनाच्या दालनात रुबाबात प्रवेश केला.

राज्यभिषेकाचे दालन हिंदू परंपरेनुसार ३२ शुभशकुन चिन्हांनी सजवलेले होते. सभासदबखर म्हणते त्याप्रमाणे ३२ मण सोन्याचे भव्य सिंहासन सोन्याच्या पत्र्याने मढवलेले होते. छत्रपती शिवाजीराजे सिंहासनावर दिमाखात आरुढ झाले. सोळा सवाष्णींनी त्यांना ओवाळले. ब्राह्मणांनी मोठ्या स्वरात मंत्रांचे उच्चारण केले. प्रजेनी महाराजांना शुभाशीर्वाद दिला. छत्रपती शिवाजी महाराज की जय! छत्रपती शिवाजी महाराज की जय!! असा जयघोष करण्यात आला. सोन्याचांदींची फुले उधळली गेली. विविध-ढोल, नगारे, तुतारी, सनई आदी तालवाद्यांच्या निनादाने व सूरवाद्यांच्या मंगलसुरांनी आसमंत दुमदुमून गेले. आधीच ठरविल्याप्रमाणे प्रत्येक गडावरून धडाक धूम... तोफा डागल्या गेल्या. मुख्य पुरोहित गागाभट्टांनी पुढे येऊन राजांच्या डोक्यावर मोत्यांची झालर ठेवत शिवछत्रपती म्हणून उच्चार केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जनांना खुप धनधान्य भेट म्हणून दिले. त्यांनी एकून सोळा प्रकारचे महादान केले. त्यानंतर विविध मंत्रिगणांनी सिंहासनापुढे जाऊन राजांना अभिवादन केले. शिवछत्रपतींनी त्यांना या प्रसंगी विविध पदे, नियुक्तिपत्रे, धन, घोडे, हत्ती, रत्ने, वस्त्रे, शस्त्रे दान केलीत. हे सर्व सकाळी आठ वाजेपर्यंत संपले. समारंभ संपल्यावर छत्रपती शिवाजी महाराज पहिल्यांदाच एका देखण्या घोड्यावर स्वार होऊन जगदीश्वराच्या मंदिराकडे गेले. तिकडून हत्तीवर स्वार होऊन त्यांची मिरवणूक रायगडावर निघाली. इतर दोन हत्तींवर जरीपटके आणि भगवे झेंडे घेऊन सैन्यांचे प्रतिनिधी होते. सोबत अष्टप्रधान मंडळ आणि इतर सैन्यदळ होते. रायगडावर ही मिरवणूक जात असताना सामान्य जनांनी फुले, चुरमुरे उधळले; दिवे ओवाळले. रायगडावरील विविध मंदिरांचे दर्शन घेऊन राजे महालात परतले.

राज्याभिषेकाच्या दिवसापासूनच स्वराज्यातील राजपत्रांवर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती असे नमूद करणे सुरु झाले. शिवरायांनी राज्याभिषेकाच्या दिवसापासून नवीन शक सुरु केले आणि छत्रपती शिवराय शककर्ते राजे झाले. याच शकाला शिवराज्याभिषेक शक संबोधले जाते. शिवरायांनी आपल्या स्वतःच्या स्वराज्यात स्वतःच्या नावाची नाणी पाडली. तांब्याच्या पैश्याला- शिवराई व सोन्याच्या पैश्याला- शिवराई होन म्हटले जाऊ लागले. स्वराज्यात अधिकृतरीत्या शिवरायांनी अष्टप्रधान मंडळाची नेमणूक केली. अनेक सरदार व मंत्री यांना स्वराज्याची कामे आणि जबाबदाऱ्या वाटून दिल्या. रायगडावर दि.६ जून १६७४ रोजी झालेला शिवराज्याभिषेक सोहळा हा त्या गडावर आलेल्या प्रत्येकासाठी जणू दसरा-दिवाळी उत्सवासारखाच होता. आपल्या लाडक्या राजाला सिंहासनावर बसलेला पाहण्यासाठी असंख्य जनता आसुसून तेथे उपस्थित होती. हा सोहळा ज्यांनी याचि देही, याचि डोळा अनुभवला त्या प्रत्येकाच्या मनात आपण धन्य झालो, ही एकच भावना होती. या सोहळ्यात अशा काही खास गोष्टी करण्यात आल्या, ज्या केवळ ऐकून तुमच्या अंगावर रोमांच उभा राहिल्याखेरीज राहणारच नाही. ज्या ऐकून तुम्हाला कदाचित तुमच्या डोळ्यासमोर या शिवराज्याभिषेक सोहळ्याची हलकीशी छटा सुद्धा निर्माण होईल, चित्रफितीसारखी!

!! शिवछत्रपती शिवाजी महाराज की जय !!

# दोन वर्षांपासून अर्धवट सोडलेल्या रस्त्यासाठी सरपंचासह ग्रामस्थांचे उपोषण ; उपोषणाचा तिसरा दिवस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

तालुक्यातील किनगाव राजा येथील रस्त्याचे काम गत दोन वर्षांपासून ठेकेदाराने अर्धवट स्थितीमध्ये सोडलेला आहे सदर रस्ता ताबडतोब पूर्ण करावा या मागणीसाठी किनगावराजा येथील सरपंच प्रकाश मुंढे यांच्यासह ग्रा.पं. सदस्य संतोष काकड,ग्रामस्थ सूर्यकांत निंबाळकर व महादेव दराडे यांनी तारीख ७ जून पासून आमरण उपोषणास प्रारंभ केला असुन आज उपोषणाचा तिसरा दिवस आहे

किनगावराजा ते हिवरखेड रस्त्याचे बांधकाम गेली दोन वर्षांपेक्षाही जास्त दिवसांपासून सुरु असून सदर रस्ता अर्धवट स्थितीमध्ये सोडल्याने दररोज कामानिमित्त रस्त्यावरून ये - जा करणाऱ्यांना व अगदी रस्त्याच्या कडेला घरे असणाऱ्या ग्रामस्थांना अत्यंत त्रास होत आहे.राज्य महामार्गाला जोडणारा हा मुख्य रस्ता असल्याने ज्या ठिकाणी हा रस्ता अर्धवट सोडण्यात आला आहे तेथून येणाऱ्या चारचाकी व दुचाकी वाहनधारकांना आपापले वाहन चालवताना अपघात होऊ नये यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.दररोजच्या या त्रासामुळे कंटाळून तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता तसेच रस्त्याचे काम ज्यांनी घेतले आहे ते ठेकेदार हे सुद्धा वारंवार तक्रार देऊनही दुर्लक्ष्य करीत असल्याने गावच्या सरपंचासह ग्रामस्थांनी आठ दिवसांपूर्वी उपविभागीय अधिकारी,तहसीलदार व सार्वजनिक बांधकाम विभागास रस्त्याचे काम पूर्ण करा अन्यथा उपोषण करणार असा ईशारा निवेदनाद्वारे दिला होता परंतु तरीही सदर रस्त्याचे काम पूर्ण न केल्यामुळे उपोषणास प्रारंभ




करण्यात आला असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले आहे.

हिवरखेड पूर्णा रोडवर सकाळी ११ च्या दरम्यान उपोषण सुरू करण्यात आले असून या दरम्यान माजी आमदार शशिकांत खेडेकर यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांच्या मागणी संदर्भात चर्चा करून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीद्वारे रस्त्यासंदर्भात सूचना दिल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता बालाजी काबरे यांच्याशी संपर्क साधला असता जिल्हा कार्यकारी अभियंता यांना पत्र पाठवून सदर रस्त्याचे ठेकेदार रामा नाथा दराडे यांनी वेळेवर रस्त्याचे काम पूर्ण केले नसल्याने त्याच्यावर दररोज ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात येऊन सदर ठेकेदारचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी केली असल्याचे सांगितले आहे.ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाचा कुठलाच समन्वय नसल्याचे यावेळी दिसून आले असून ग्रामस्थांना मात्र याचा विनाकारण त्रास होत आहे. प्रशासनाकडूनही आमची समस्या दूर झाली नसल्यानेच आमरण उपोषण करीत असल्याचे सरपंचासह ग्रामस्थांनी सांगितले आहे. सदर उपोषणकर्ते यास हिवरखेडच्या ग्रामपंचायतीने उपोषणास पाठिंब्याचा ठराव दिला आहे.

# मुलीच्या जन्माचा पाटोदा शहरात रंगला स्वागत सोहळा

## आजोबांनी केला नातीचा जन्मोत्सव साजरा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

नात झाल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी आजोबांनी नातीचा जन्मोत्सव साजरा केला. एकीकडे मुलगा म्हणजेच वंशाचा दिवा अशी मानसिकता असताना, दुसरीकडे अशा प्रकारे सकारात्मक आणि आदर्श पावले ही उचलली जात आहेत. पाटोदा शहरात एक अनोखा स्वागत सोहळा साजरा झाला. एक चिमुकली पाहुणी घरी येणार होती, तिच्या स्वागताला पाटोदा शहरातील महासांगवी रोड वरील जाधव कुटुंब जणू आसुरलेलं होतं, सकाळ पासूनच सर्व कुटुंब या चिमुकलीच्या आगमनाची वाट पाहत होते. ही पाहुणी दुसरी-तिसरी कुणी नसून दोन दिवसांपूर्वी जन्मलेली जाधव कुटुंबाची नात होती. आपल्या तान्हुल्या नातीच्या स्वागतासाठी तिच्या आजोबांनी मोठा समारंभ आयोजित केला होता.

पाटोदा तालुक्यातील कुसळंब (ह.मु.नाशिक) येथील शिवानी आबासाहेब पवार यांच्या पोटी कन्यारत्न जन्माला आले, दि.०३जुन रोजी बीड येथील खाजगी रुग्णालयात या मुलीने जन्म घेतला. मुलगी जन्माला आल्याचा आनंद या दाम्पत्य व आजोबा दिलीप जाधव यांच्या व कुटुंबीयांच्या गगनात मावत नव्हता. दवाखान्यातून घरी आणताना स्वागत समारंभ करण्याची योजना आजोबा दिलीप जाधव यांनी आखली. त्यांच्या कुटुंबीयांनी सुध्दा आनंदात हिरहिरीने भाग घेत फटाक्यांची आतिषबाजी, रांगोळी, फुलांच्या पायघड्या घराची सजावट आदी करण्यात आले. सायंकाळी ०६:०० वाजण्याच्या सुमारास लाडक्या लेकीचं आगमन झालं, फटाक्यांची आतिषबाजी, औक्षण करुन या नव्या जीवाचं मोठ्या जल्लोषात स्वागत झालं. केवळ या साठी फक्त कुटुंबीय नाही तर नातलग, शेजारी या आनंद सोहळ्याचा भाग बनले होते. या वेळी नवजात मुलीच्या आई-वडिलांना झालेला आनंद अवर्णनीय झाल्याचे दिसून आले. मुलीच्या जन्माचे स्वागत हा बदल समाज मनाला नवी दिशा देणारा आहे. पाटोदा शहरातील हा स्वागत सोहळा महाराष्ट्राला अनुकरणीय ठरावा असा आहे. तसं झालं तर लेक वाचवा अभियानाला खऱ्या अर्थाने गती येईल.

# धनगर आरक्षणासाठी केकतसारणीत दोन तरुणांचे पाण्याच्या टाकीवर चढून शोलेस्टाईल आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज (वृत्तसंस्था)**



धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देऊन अंमलबजावणी करण्यात यावी या मागणीसाठी तालुक्यातील केकतसारणी (ता. केज) येथील दोन तरुणांनी गुरुवारी ६ जुन रोजी पाण्याच्या टाकीवर चढून उपोषण सुरू करीत शोलेस्टाईल आंदोलन सुरू केले आहे.केज तालुक्यातील केकतसारणी येथील आनंद राजेभाऊ धायगुडे, संदिप धोंडीराम धायगुडे या दोन तरुणांनी धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देऊन अंमलबजावणी करण्यात यावी या मागणीसाठी गुरुवारी गावातील पाण्याच्या टाकीवर बसून आमरण उपोषण करणार असल्याचे, याची दखल न घेतल्यास व शुक्रवारी ७ जुन रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत आरक्षणाचा विषय मार्गी न लागल्यास आत्मदहन करू असा इशारा तहसीलदारांना लेखी निवेदनाद्वारे ५ जून रोजी दिला होता.

# पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करून ओंकार चौगुले यांचा वाढदिवस साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपुलकीचे सदस्य सुरेशकाका चौगुले यांचे सुपुत्र ओंकार चौगुले यांच्या वाढदिवसानिमित्त आपलं समर्थनगर, (कडलास रोड) याठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

आपुलकी सदस्यांच्या वाढदिवसानिमित्त यावर्षी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेण्यात



आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आपुलकी सदस्य सुरेशकाका चौगुले यांचे सुपुत्र ओंकार चौगुले यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण दिनाचे औचित्य साधून करंज या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, अरविंद केदार, महादेव दिवटे, प्रा. डॉ. विधिन कांबळे,अरविंद डोंबे गुरुजी, इंजि. विकास देशपांडे, रविंद्र कदम, अण्णासाहेब मदने, अमर कुलकर्णी, प्रसन्न कदम, बंडू मारडे, अण्णासाहेब केदार, पांडुरंग केदार, शशिकांत केदार, सुनिल सावंत, नंदकुमार जाधव, सचिन शेळके, बबलू पाटील, ओंकार दिवटे, अक्षय डांगरे, सत्यजित पाटील, प्रभाकर इंगोले आदी उपस्थित होते.

# अखेर मान्सूनचे महाराष्ट्रात आगमन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

राज्यातील जनतेसाठी अत्यंत आनंददायी बातमी समोर आली आहे. अखेर नैर्ऋत्य मोसमी पावसाचे झालं आहे. याबाबतची माहिती हवामान खात्याच्या पुणे शाखेचे प्रमुख डॉ. होसाळीकर यांनी दिली आहे. नैर्ऋत्य मोसमी पाऊस कोकणातील रत्नागिरी, सोलापूर आणि पुढे मेडक, भद्राचलम विजयनगरम आणि त्यानंतर बंगालच्या खाडीपासून इस्लामपूरपर्यंत पोहोचल्याची माहिती होसाळीकर यांनी दिली आहे.

आज कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, सांगली आणि मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यात पावसाची शक्यता आहे. तर पुढील चार दिवस राज्यातील बहुतांश भागात मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. दक्षिण कोकण, उत्तर कोकण,



मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज आणि उद्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी ८ जून रोजी आणि रविवारी ९ जून रोजी सिंधुदुर्ग, कोल्हापुरात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. राज्याच्या अन्य भागांतही जोरदार पावसाची शक्यता आहे. रविवारपासून पुढील दोन दिवस मुंबईसह सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगडसह पश्चिम घाटात जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. विदर्भासह राज्याच्या बहुतेक भागांत हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.

# धर्मेंद्र कांबळे यांना द ग्रामीण युवा पत्रकार संघ महाराष्ट्र आयोजित राज्यस्तरीय उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी द युवा ग्रामीण पत्रकार संघातर्फे विवीध क्षेत्रांतील मान्यवरांना उत्कृष्ट कामगिरी बद्दल पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. प्रथम कार्याचा अहवाल मागुन त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली जाते. संघटनेतर्फे पुरस्कार सन्मान सोहळयात सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात येणार आहे. त्यात सामाजिक,क्रिडा,वैद्यकीय, सांस्कृतीक, राजकीय, औद्योगिक इत्यादी क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना या संघटने मार्फत पुरस्कार दिले जातात. यावर्षीच्या उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्कारांसाठी एका खेडेगावातून आलेल्या धर्मेंद्र कांबळे ची निवड झाल्याने गावात एक आदर्श घालून दिला आहे व सर्वच स्तरातून त्याचे कौतुक केले जातं आहे. धर्मेंद्र हा मूळचा राहणार तुगाव ता:-उमरगा जि:-उस्मानाबाद चा आहे. धर्मेंद्र चे प्राथमिक शिक्षण आष्टा हायस्कूल आष्टा कासार येथे झाले. अन् पुढील शिक्षण कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी लातूर येथे झाले. आईचे नाव शालुबाई अन् वडिलांचे नाव सोपान कांबळे. या कांबळे दांपत्याने आपल्या गरीब परिस्थितीतही मुलांना चांगले शिक्षण दिले. आपल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी धर्मेंद्र ने हाताला मिळेल ते काम करीत अन् आपल्या कुटुंबाला हातभार लावत असे.

उदरनिर्वाह साठी गाव सोडुन पुण्याला आलेला धर्मेंद्र हाऊसकिपिंग मध्ये काम करायचा, फळं विकायचा, कुल्फी विकायचा यातूनच त्याला उद्योगाचे महत्व समजले व अनुभव येत गेले. आतला उद्योजक शांत बसत नव्हता. त्याला कळून चुकले की माझ्यासारख्या कित्तेक लोकांना कामाची गरज आहे. आपल्या कामाच्या अनुभवातून त्याला हे समजले की पुण्यामध्ये अनेक जणांना घरकामासाठी, पेशंट ची काळजी घेण्यासाठी कामगारांची गरज आहे. ज्यांना कामगारांची ओळख आहे अशा लोकांची



एकमेकांना ओळख करून देऊ लागला. हे काम करत असताना कामगार पण आनंदित होऊन मोबदला म्हणुन पैसे देऊ लागले , तसेच चांगला कामगार दिला म्हणून कस्टमर पण मोबदला देऊ लागले या सगळ्या गोष्टीतून त्याच्या नव्या उद्योगाची सुरुवात झाली.

ज्या वयात मुले खेळून खात असतात त्याच वयाच्या पंचवीस व्या वर्षी होम केअर नर्सिंग ब्यूरो (रिकाम्या हाताला आरोग्य क्षेत्रात काम देणारी कंपनी) या कंपनी ची स्थापना केली. पैश्याबरोबरच समाजसेवेच काम जोरात चालु केलं. सर्व कामे गुणवत्तापुर्ण व पारदर्शक होऊ लागल्याने कस्टमर ची संख्या पण वाढू लागली अन् कामगारांची संख्या पण. त्यामुळे हिंजवडी येथे भाड्याने ऑफिस घेतले जसे काम वाढू लागले तसे परत ऑफिस ची संख्या वाढवली व्यवसाय सांभाळण्यासाठी त्याने ऑफिसला स्टाफ ठेवला.कामगारांना राहण्यासाठी पुण्यामध्ये होस्टेलची व्यवस्था केली. सातारा , सोलापूर , पुणे, मुंबई या ठिकाणी ऑफिसेस चालू केले सध्या होम केअर नर्सिंग ब्युरो च्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सेवा देण्याचे काम चालू आहे. या सर्व गोष्टींची दखल घेऊन द ग्रामीण युवा पत्रकार संघ महाराष्ट्र आयोजित २०२४ चा उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्कार धर्मेंद्र ला जाहीर झाला. Website: https://www. home carenursin gbureau .in/ येणाऱ्या काही दिवसातच धर्मेंद्र ला पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

# कडलास येथे शेतीमध्ये पाणी शेतीपीकाचे नुकसान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुक्यातील कडलास येथे शेतात पाणी घुसून शेतकऱ्यांच्या शेतातील पीकाचे नुकसान .शेती पीकासह वैरणीची ढेपण पाण्याखाली गेल्याने कडबा खराब झाला. कडलास ग्रामपंचायतीचा मनमानी कारभार गेले अनेक वर्षे पासून इतर शेती नाल्यातून येणारे पावसाचे पाणी पुलाद्वारे शेतीत सोडले जाते, यावर कोणताही उपयोजना केली जाते नाही. यामुळे शेती नापीक होत आहे. प्रत्येक वेळी ग्रामपंचायत प्रशासन अन्याय वागणूक देत आहे. शेतीत येणाऱ्या सांडव्याचे पाणी येत्या दोन दिवसांत प्रशासनाने व्यवस्था न केल्यास उपोषणाला करणार असा इशारा शेतकरी अशोक गायकवाड यांनी दिली

# राज्यात ५० हजार झाडे लावण्याचा पुरोगामी शिक्षक संघटनेचा निर्धार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेची राज्य कार्यकारिणी सभा कणकवली जि.सिंधुदुर्ग येथे राज्य नेते विजय भोगेकर यांचे उपस्थितीत नुकतीच बैठक संपन्न झाली,या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील होते,निसर्गातील वाढते तापमान व वाढलेली वृक्षतोड यामुळे निसर्गाचे संरक्षण करणे ही काळाची गरज असल्याचे मत बैठकीत उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

बैठकीत शिक्षकांची रिक्त पदे १००% भरावीत,संच मान्यतेचे अन्यायकारक निकष रद्द करावेत,बालकांच्या मोफत शिक्षणाचा अधिकार कायद्यानुसार इयत्ता ५ वी इयत्ता ८ वी चे वर्ग विनाअट जिल्हा परिषद शाळेस जोडावेत इयत्ता ६ वी ते ७ वी अथवा इयत्ता ६ वी ते ८ वी च्या वर्गांना विनाअट ३ शिक्षक मंजूर करावेत,आंतरजिल्हा ७ वा टप्पा लवकरात लवकर सुरू करावा, आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना तात्काळ मुक्त करावे, जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांना शिपाई पद मंजूर करावे,सर्व केंद्र शाळांना क्लार्कचे मंजूर करावे, शालेय पोषण आहार स्वतंत्र यंत्रणेकडे द्यावा, जून व डिसेंबर मध्ये वर्षातून २ वेळा पदोन्नती घेण्याचे निर्देश सर्व जिल्हा परिषदांना व्हावेत, नवीन भरतीतील उमेदवारांना लवकरात लवकर नियुक्ती देण्याचे निर्देश. व्हावेत आदी मागण्यांचे ठराव संमत करण्यात आले.यावेळी या बैठकीस राज्य नेते विजय भोगेकर,राज्यसरचिटणीस हरिश ससनकर,राज्य कार्याध्यक्ष प्रकाश पाध्ये, राज्य कोषाध्यक्ष जी.एस.मंगनाळे,महिला राज्य सरचिटणीस राज्य महिला सरचिटणीस,प्रकाश पाटील राज्य संघटक,राज्य कार्यकारी सचिव रंगराव वाडकर,प्रेमिला माने राज्य महिला उपाध्यक्ष,यावेळी सुरेश साळवी जेष्ठ सल्लागार रत्नागिरी, गोविंद पाटील रायगड जिल्हा नेते, सचिन जाधव सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष,एस के पाटील जिल्हाध्यक्ष कोल्हापूर, किशोर आनंदवार जिल्हाध्यक्ष चंद्रपूर, इरफान मिर्झा जिल्हाध्यक्ष वाशिम, महेंद्र हिवे जिल्हाध्यक्ष अमरावती, रत्नागिरी जिल्हाध्यक्ष यशवंत पेंढारकर संघर्ष सावरकर जिल्हाध्यक्ष,सिंधुदुर्ग जिल्हा सरचिटणीस प्रकाश वाडकर, प्रदिप पवार जिल्हा



सरचिटणीस रत्नागिरी,कोल्हापूर जिल्हा सरचिटणीस तुषार पाटील,जिल्हा कार्याध्यक्ष गंगाधर बोढे,जिल्हा उपाध्यक्ष संभाजी पाटील ,अमरावती जिल्हा उपाध्यक्ष नितीन पेढेकर,जीवन भोयर,गजानन चिंचोळकर सुभाष अडवे,जिल्हा उपाध्यक्ष चंद्रपूर,जिल्हा उपाध्यक्ष किरण राठोड ,जिल्हा संघटक बालाजी हाळदे,जिल्हा संघटक देवराव अमोदे गोकुळ चारथळ अचलपूर तालुकाध्यक्ष,लक्ष्मण खोब्रागडे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख चंद्रपूर,किशोर यनगंटीवार चंद्रपूर तालुका उपाध्यक्ष,लक्ष्मण सुरपाम चंद्रपुर तालुका संघटक जगदीश ठाकरे चेअरमन शिक्षक सहकारी पतसंस्था भद्रावती,बाबा रणसिंग तालुकाध्यक्ष पन्हाळा,नाथ मोरे तालुकाध्यक्ष पन्हाळा,मनोज पवार तालुका उपाध्यक्ष पन्हाळा यांच्या सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.सभेच्या सुरूवातीला सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष सचिन जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले तर आभार संधुदुर्ग जिल्हा नेते अशोक जाधव यांनी माणरे,सभेचे सुत्र संचलन राज्य सरचिटणीस हरिश ससनकर यांनी केले.

> **“ राज्यात ५० हजार झाडे लावण्याचा पुरोगामी शिक्षक संघटनेने निर्धार केला आहे, या पावसाळ्यात महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेने राज्यात झाडे लावून त्यांचे संवर्धन केले जाणार, असल्याची माहिती दैनिक लोकनेता प्रतिनिधीशी बोलताना सांगितले राज्यात पुरोगामी संघटनेच्या राज्य कार्यकारिणी सभेत तसा ठराव संमत करण्यात आला आहे.**

# पंकजाताई यांच्या बद्दल आक्षेपार्ह स्टेटस ठेवल्याप्रकरणी बिबी शहर कडकडीत बंद

## शेवली पोलिसांनी घेतले आरोपीला ताब्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

दि.९ जून लोणार तालुक्यातील बिबी येथे पंकजाताई मुंडे यांच्या बद्दल आक्षेपार्ह स्टेटस ठेवल्या मुळे बिबी येथे कडकडीत बंद पाळण्यात आला होता. सविस्तर वृत्त असे की मंठा तालुक्यातील वझर सरकटे येथील युवक अनिकेत सरकटे याने लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या बद्दल आक्षेपार्ह स्टेटस ठेवल्या प्रकरणी महाराष्ट्रातील तमाम मुंडे समर्थकासह समाजाच्या भावना दुखावल्या होत्या त्या निषेधार्थ लोणार तालुक्यातील बिबी



येथे कडकडीत बंद पाळण्यात आला या बंदला सर्व व्यापारी व सर्वच समाजाने पाठींबा दिला बाजारपेठ बंद असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची गावकऱ्यांनी व्यवस्था केली होती संपुर्ण घटनेच्या निषेधार्थ युवकांनी घोषणा बाजी करत निषेध व्यक्त केला अनुचित प्रकार घडु नये म्हणून बिबी पोलीस स्टेशन चे ठाणेदार संदीप पाटील यांनी पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# देऊळगाव घाट सहकारी सेवा सोसायटीचे सचिव पद त्वरित भरा अन्यथा अमरण उपोषण-संतोष चव्हाण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

देऊळगाव घाट सहकारी सेवा सोसायटीचे सचिव पद,हे एक वर्षापासून रिक्त आहे.हे पद त्वरित भरा,अन्यथा अमरण उपोषण छेडले जाईल असा इशारा,देऊळगाव घाट चे बंजारा सेनेचे युवा नेते,संतोष चव्हाण यांनी दिला आहे. मौजे देऊळगाव घाट हे गाव बीड जिल्हा सहकारी बँक अंतर्गत आहे.गावात चेअरमन व सभासद हे पद आहे.व इतर शेतकरी वर्गावर सोसायटी नसतानाही उतार्यावरती बोजा आहे.गावातील शेतकऱ्यांना बँकेमार्फत मूलभूत फायदे तर नाहीत,परंतु इतर बँकेत काही फाईली करायचे असतील तर त्यांना सेवा सोसायटीचे निल सर्टिफिकेट ची आवश्यकता असते.त्याकरता सचिव,सेक्रेटरी, हे काम पाहतात.पण ह्या



गावासाठी कोणीही नाही ही बाब खेदाची आहे.

मौजे देऊळगाव घाट चे शेतकरी ७० कि.मी.हून आष्टी तालुक्याला येतात. त्या ठिकाणी चौकशी करतात.पण निबंधक साहेब म्हणतात की,आम्ही चार्ज हा अल्ताफ बेग यांना दिला आहे. पण ते चार्ज घेण्यास तयार नाहीत.जर ते कामचुकार पणा करीत असतील तर,त्यांना कामावर राहण्याचा अधिकार नाही.असे संतोष चव्हाण यांनी सांगितले आहे.यांची सर्व झळ देऊळगाव घाट व इतर सात गावा मधल्या सर्व शेतकऱ्यांना बसत आहे.लवकरात लवकर देऊळगाव घाट सेवा सहकारी सोसायटीला,सचिव पद नेमावे अन्यथा,तस झाले नाही तर,सर्व शेतकऱ्यांच्या वतीने ऑफिस समोर अमरण उपोषण केले जाईल.व आंदोलन करत्यास काही कमी जास्त काही झाले तर, त्यास शासन जबाबदार राहील.

# सुलतानपूर येथील विविध समस्या बाबत नागपूर-मुंबई महामार्गावर रास्ता रोको आंदोलन-नागवंशी संघपाल पनाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

सुलतानपूर ता. लोणार येथील वार्ड क्र.१,२,६ मध्ये जाणून-बुजून राजकीय व्देष भावनेतून विकास कामे न करणाऱ्या व आलेल्या निधीचा गैरवापर करून बोगस काम करणाऱ्या सरपंचाला निलंबित करून गुन्हा दाखल करण्यात यावा. व मुजोर वैद्यकीय अधिकारी सोनी मॅडम यांची तत्काळ हकालपट्टी करण्यात यावी. या व आदी मागण्यासाठी. नागवंशी, संघपाल पनाड वंचित नेते व ईतर ग्रामपंचायत सदस्य यांच्या नेतृत्वामध्ये सुलतानपूर येथे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक मुंबई-नागपूर हायवे वरती डफडे वाजून रस्ता रोको आंदोलन.

सुलतानपूर ग्रामपंचायत ही लोणार तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असून या ठिकाणी दरवर्षी करोड रूपयांचा निधी येतो. परंतु सरपंच पती यांच्या मनमानी कारभारामुळे व राजकीय दोष भावनेमुळे ज्या वार्डामध्ये विकास कामे करण्याची खरी गरज आहे त्या ठिकाणी विकास कामे होत नाहीत. ज्या ठिकाणी अगोदर विकास कामे झाली आहेत परत त्याच ठिकाणी जाणून-बुजून विकासकामे केली जातात. सध्या गावांमध्ये भयंकर पाणीटंचाई असून नळाला येणारे पाणी हे २०ते २५ दिवसांनी येते यासाठी सरपंच यांच्याकडून पाण्यासाठी कुठलीच उपाययोजना केली जात नाही. विद्यमान सरपंच पती हेमराज लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या दहा-पंधरा वर्षा अगोदर सुलतानपूर येथे अंदाजे दोन कोटी रुपयांची महाजल योजनेचे काम झाले होते. परंतु ते कागदोपत्री दाखवून करोड रुपयांच्या भ्रष्टाचार त्या कामामध्ये झालेला आहे. त्यामुळे सुलतानपूर वाशियांना पाण्यासाठी



भटकंती करावी लागते. त्यानंतर सध्या सुलतानपूर सह पाच गावांमध्ये २२ कोटी रुपयांचे जलजीवन मिशन योजनेचे काम सध्या चालू आहे परंतु हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे म्हणजे त्या कामामध्ये माती मिश्रित डस्ट च्या साह्याने टाकीचे काम होत आहे. दीड ते दोन फुटावर पाईप टाकून बोगस पद्धतीने होत आहे. केवळ पदाधिकाऱ्याच्या टक्केवारीमुळे बोगस काम होत आहे.महाजल प्रमाणेच हे काम न होता अंदाज पत्रकानुसार व्हावे. व झालेले बोगस काम जमीनदोस्त करण्यात यावे. २०२३ -२३मध्ये दलित वस्ती अंतर्गत वीस लाख रुपयांचे सिमेंट रोडचे काम वार्ड क्रमांक ५ मध्ये करण्यात आले. परंतु हे काम अंदाजपत्रकानुसार न करता अत्यंत बोगस पद्धतीने करण्यात आले. आज रोजी त्या रोडला तडे जाऊन अनेक ठिकाणी रोड उखडला आहे. त्यामुळे बोगस काम करणाऱ्या ठेकेदार अधिकारी कर्मचारी व पदाधिकारी यांच्यावर अनुसूचित जाती जमाती अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावे. व सरपंच पती यांचा अनेक वेळा ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजामध्ये हस्तक्षेप झाल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे सरपंच यांना तत्काळ निलंबित करण्यात यावे. या व आदी मागण्याच्या संदर्भात व ग्रामपंचायत मधील भोंगळ कारभाराविरोधात सुलतानपूर येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी मुंबई- नागपूर हायवे वरती डफडे वाजून रस्ता रोको आंदोलन. दि.१०/०६/ २०२४ रोज सोमवारला ठीक सकाळी १०: वाजता करण्यात येत आहे.

# मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान शपथविधी घेताच चारठाणा येथे आनंद उत्सव साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चारठाणा । श्रीपाद जोशी**

चारठाणा येथे देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी विराजमान होताच चारठाणा येथे नागरिकांनी आनंद उत्सव साजरा करण्यात आला भारत स्वतंत्र झाल्यापासून पंडित जवाहरलाल नेहरू यांचा कार्यकाल वगळता आजपर्यंत कोणताही पंतप्रधान तिसऱ्या वेळेस पंतप्रधानपदी विराजमान झाला नाही ही किमया फक्त नरेंद्र मोदी यांनी केली आहे सबका साथ सबका विकास ह्या ध्येयधोरणानुसार भाजपा बद्दल असलेली सहानुभूती भारतीय लोकांनी पुन्हा एकदा विश्वास ठेवून पंतप्रधानपदी विराजमान केले आहे महाराष्ट्र व उत्तर प्रदेश येथे जनमताचा कौल भाजपा यांना जड गेला आहे परंतु इतर राज्यांनी दिलेली साथ व घोडदौड पाहता पंतप्रधान पदी नरेंद्र मोदी यांचा रथ दिल्लीपर्यंत पोहोचला.यावेळी चारठाणा येथे नंदकुमार देशपांडे, विलास गुरु जोशी, रतनराव देशपांडे, रवी जोशी सर, जनार्दन जोशी, रमेश देशपांडे, संभाप्पा गजमल, गणेश देशपांडे, भानुदास जोशी, मनीष जोशी, श्रीपाद जोशी, अनिल देशपांडे,राजू थोरात, गिरीश जोशी, श्रीपाद देशपांडे, राघव देशपांडे, श्रेयस देशपांडे प्रसाद देशपांडे यांनी आनंद उत्सव साजरा केला.

## साई केंब्रिज विद्यालयात

# व्यसनमुक्ती मधुमेह मुक्ती आणि वेदना मुक्ती शिबीर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

काल दिनांक ९ जून वार रविवार रोजी साई केंब्रिज इंग्लिश स्कूल वालसावंगी व आधार फाउंडेशन यांचा वतीने व्यसनमुक्ती मधुमेह मुक्ती मार्गदर्शन केंद्र जालना यांच्या संयुक्त विद्यमाने मधुमेह मुक्ती व वेदना मुक्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन अर्चना विनोद वाघ सरपंच वालसावंगी यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष हिरालाल मामा कोथलकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून शंकर तोताराम भुते, लक्ष्मण मामा मळेकर, अजिंक्य वाघ, प्रकाश पवार, किरण राजे कोथळकर डॉक्टर दिलीप भुते,गोलू शेठ जयस्वाल, बाळू आहेर, गणेश गाडेकर, विशाल आस्वार, विजय गवळी, विनोद कोथलकर, अशोक भुते, व विश्वनाथ भुते,



वालसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्राचे इन्चार्ज डॉक्टर निलेश मळेकर तसेच गावातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक किरण कुमार रघुनाथ भुते अध्यक्ष साई शिक्षण संस्था व कपिल रघुनाथ भुते सचिव साई शिक्षण संस्था यांनी केले होते डॉक्टर प्रवीण जाधव एमडी आयुर्वेद यांनी व्यसनमुक्ती शिबिरात जवळपास १५२ पेशंटचि तपासनी केली.

# अखेर वनवास संपला ! संदिप खाकाळ यांच्या प्रयत्नातून वाघुले वस्ती रस्त्याचे स्वप्न साकार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

गावाचे नंदनवन करण्याचे ध्येय उराशी बाळगून शेरी बु सरपंच युवानेते संदिप खाकाळ यांनी माजी राज्यमंत्री आ.सुरेश धस यांच्याकडे सतत पाठपुरावा करून आपल्या गावाचा विकास कसा करता येईल ? यासाठी अहोरात्र प्रयत्न करत असल्याने गावकरी समाधान व्यक्त करताना दिसत आहेत

याविषयी सविस्तर माहिती अशी की,शेतीमधील कमी होणारी मनुष्यबळाची उपलब्धता लक्षात घेता शेतीची कामे करताना यंत्रांचा उपयोग वाढला आहे. यांत्रिकीकरणामुळे शेतीमध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी व इतर कामे करण्यासाठी,यंत्रसामुग्री शेतापर्यंत नेण्यासाठी आणि शेतीमाल बाजारात पोहचविण्या करीता बारमाही शेतरस्त्यांची आवश्यकता असते.असे रस्ते तयार करून शेतकऱ्यांना सुविधा देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्यात 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.शासनाच्या या योजनेचा लाभ आपल्या गावातील लोकांना झाला पाहिजे त्यातून मजुरांच्या हाताला काम मिळाले पाहिजे व ज्या ठिकाणी रस्त्याची गरज आहे त्याठिकाणी रस्ता करण्यासाठी सरपंच संदिप खाकाळ हे सतत प्रयत्न करीत होते आज त्यांच्या सततच्या पाठपुराव्याने मंजूर झालेला अतिशय महत्त्वाचा व अनेक वर्षांपासून प्रलंबित केरूळ रोड ते वाघुले वस्ती पांदण रस्त्याचे आज श्री.संदिप साहेब खाकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. दशरथ (तात्या) गोरे व श्री.राहूल गोरे यांच्या हस्ते उद्घाटन करून रस्त्याला सुरुवात करण्यात आली. यावेळी उपसरपंच दिपक दादा सोनवणे,शिवाजी डोरले,परशुराम शिरोळे,चेअरमन नवनाथ वाघुले, दयानंद भालेकर,शिवाजी कन्हेरकर, बबन वाघुले, अमोल वाघुले, ज्ञानेश्वर गोरे, यांच्यासह इतर नागरिक उपस्थित होते.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904